# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 20/09/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

**जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण पोलीस दला तर्फे 22 सप्टेंबर ला ई– चालान भरा अन्यथा वाहन जप्ती.**

वारंवार सुचना अन पत्र पाठवुनही वाहनचालक ई चालन भरण्यास तयार नसल्याने पोलिसांनी आता अशा वाहनचालकांची केस लोक अदालतीत ठेवण्याची प्रक्रीया सुरू केली आहे या पार्श्वभूमीवर, जिल्हा वाहतूक शाखा नागपूर ग्रामीण यांनी 1090 वाहन चालाकंना मोबाईल वर चलान भरणे करीता नोटीस पाठविलेले आहेत.

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 1090 वाहनचालकांना विरूध्द जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांनी दंडात्मक स्वरूपाची कारवाई केली. या वाहनधारकांनी ई चलानच्या दंडाच्या रूपातील 11,62,900 रू. थकीत आहे. अशांना जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांनी जिल्हा विधी प्राधिकरणाच्या माध्यमातुन 19 सप्टेंबर वाहन धारकाच्या मोबाईलवर मसेजच्या रूपात नोटीस पाठविलेली आहे. त्यांच्या कडे थकित असलेली ई चालानची रक्कम 22 सप्टेंबरला जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथे जमा करण्याची सुचना दिलेली आहे. ही रक्कम जमा केली नाही तर सबंधीत वाहनचालकांना 25 सप्टेंबरला होणाऱ्या लोक अदालतीत हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. तेथे वाहनधारकाने समाधानकारक बाजु मांडली नाही तर दंडाची रक्कम वसुल करण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखा नागपूर तर्फे सबंधीताचे वाहन जप्त करण्याची कारवाई केली जाऊ शकते.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर